RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२ (२२)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LVI OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन २०१२ चा महा. २३.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनाकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन २०१२ चा महा. अधिनियम क्रमांक २३ च्या कलम २५३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, २०१२ याच्या कलम २५३ मध्ये पोट-कलम ( २ ) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :–

"परंतु आणखी असे की, सदर कागदपत्रासोबत इमारत बांधण्याचा जिचा उद्देश असेल अशा प्रत्येक व्यक्तीने ज्या जागेवर इमारत बांधावयाची आहे, त्या जागेवर पूर्वी कारखाना असल्यास, अशा कारखान्याच्या मालकाकडून कामगारांची देय असलेली देणी अथवा इतर दायित्व नसल्याचे साक्षांकित प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक असेल."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारतात अनेक कारखाने बंद पडल्यामुळे त्याचा कामगारांच्या हितसंबंधावर परिणाम होऊन बहुसंख्य प्रकरणामध्ये कामगारांना त्यांची कायदेशीर देणी, भरपाईसुद्धा मिळेनाशी झालेली आहे. परिणामी अनेक बाबतीत औद्योगिक विवाद व न्यायालयीन खटले यात वाढ झालेली आहे. कारखान्याचे मालक कारखाने बंद करून ते विकून जाण्याची अनेक उदाहरणे निदर्शनास आलेली आहेत. न्यायालयाने निवाडे देऊनसुद्धा अनेक प्रकरणात कामगारांना त्यांची कायदेशीर देणी, उदा. थकीत वेतने, भविष्य निर्वाह निधी इत्यादी मिळत नाहीत.

काही प्रकरणात कारखान्याची जागा विकून त्या पैशातून कामगारांची देणी देण्यात येतील असे कारखाने मालक कबूल करतात. परंतु, प्रत्यक्षात मात्र जमिनी विक्री व्यवहारानंतर अशी कामगारांची देणी न देता कारखान्याचे मालक परदेशी निघून जातात व त्या ठिकाणी विकासक महापालिकेच्या परवानगीने टोलेजंग इमारती उभ्या करत असतो. या संपूर्ण प्रकारात गरीब, असंघटित कामगार त्याची हक्काची देणी न मिळाल्यामुळे देशोधडीला लागतो. कायदेशीर अज्ञान व गरीबी या कारणामुळे तो मालकासोबत कायदेशीर लढाई लढण्यास कमकुवत ठरतो. सबळ मालक आणि असंघटित व दुर्बल कामगार यामध्ये कामगारांची हार होते. या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी जोपर्यंत कामगारांची सर्व कायदेशीर देणी अदा होत नाहीत तोपर्यंत विकासकाला त्याठिकाणी गृहसंकुले उभारण्यात परवानगी देण्यात येऊ नये किंवा त्याने तसे केल्यास संबंधित महापालिकेच्या आयुक्तास ते अनधिकृत ठरविण्याचा अधिकार असावा, अशी कायद्यात सुधारणा होणे आवश्यक वाटते. कारखान्याची जमीन खरेदी केलेल्या विकासकाला कामगारांची देणी देण्याचे बंधन घालणे चुकीचे ठरेल. परंतु, एखाद्या महापालिका क्षेत्रात एखाद्या विकासकाने इमारत बांधण्यासाठी एखाद्या कारखान्याच्या मालकाकडून जमीन खरेदी केल्यास, अशा इमारतीच्या बांधकामाच्या उद्देशाची नोटीस आयुक्ताला देताना, नोटीशीसोबत द्यावयाच्या माहितीबरोबर त्या ठिकाणी पूर्वी कारखाना असलेल्या मालकाकडून कामगारांप्रती अथवा इतर दायित्व नसल्याचे नोंदणीकृत प्रतिज्ञापत्र घेऊन ते आयुक्तास सादर करावे असे बंधन घालणारी तरतूद मात्र कायद्यात करता येईल. असे केल्याने विकासकाला सदर प्रतिज्ञापत्राशिवाय इमारत बांधता येणार नाही व पर्यायाने विकासक इमारत बांधण्याच्या प्रयोजनार्थ कारखान्याच्या मालकाकडून जमीन विकत घेतानाच त्याच्याकडून प्रतिज्ञापत्राची मागणी करू शकेल व अशा रीतीने कारखान्याच्या मालकास जमीन विक्री व्यवहाराबरोबर त्या कारखान्याच्या कामगारांची देणी देणे क्रमप्राप्त ठरेल.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, २०१२ च्या कलम २५३ मध्ये उचित सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

वरील उद्देश साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १३ जून २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.